| | |
|---|---|
| MHKO160006232022 | दाखल तारीख - ०६/०७/२०२२<br>नोंदणी तारीख - ०१/०८/२०२२<br>निकाल तारीख - ०२/०७/२०२६<br>कालावधी - ०३ वर्षे ११ महिने २६ दिवस |

**नियमित फौजदारी खटला क्र.९१/२०२२** **निशानी क्र.**

**भाग अ**

( फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(i) अन्वये )

**शाहूवाडी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**

**ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर यांचे न्यायालयात**

( पिठासिन अधिकारी - पी. बी. पवार यांचेसमोर )

न्यायनिर्णय घोषित – दिनांक ०२/०७/२०२६

( नियमित फौजदारी खटला क्र.९१/२०२२ )

गुन्हा नोंद क्र.-११०/२०२२, शाहुवाडी पो. ठाणे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी / तक्रारदार | :- | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत पोलीस निरीक्षक, शाहूवाडी पो. ठाणे,<br>ता. शाहूवाडी, जि. कोल्हापुर |
| अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ | :- | सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस. व्ही. चिमटे |
| आरोपीं | :- | संजय वसंत घोलप, व.व.४१, व्यवसाय- खाजगी नोकरी,<br>रा.- थेरगाव, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर |
| आरोपींतर्फे विधिज्ञ | :- | श्री. एस. के. पाटिल |

## भाग ब

( फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(ii) अन्वये )

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | २०/०४/२०२२ |
| फिर्याद दाखल दिनांक | :- | २९/०४/२०२२ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | ०१/०८/२०२५ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | :- | २१/०५/२०२६ |
| न्यायनिर्णसाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | ०२/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | ०२/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | निरंक, आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडलेचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | संजय वसंत घोलप | ०४/०५/२२ | ०४/०५/२२ | भा.दं.वि.सं.कलम ३५४अ,४५२ अन्वये गुन्हा | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

# भाग क

( फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(iii) अन्वये )

## अभियोग पक्ष/आरोपी पक्ष/न्यायालयातर्फे साक्षीदारांची यादी

## अ) अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरूप | निशाणी |
|---|---|---|---|
| १ | निता रमेश घोलप | फिर्यादी | १८ |

## ब) आरोपीतर्फे साक्षीदार

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरूप | निशाणी |
|---|---|---|---|
| निरंक | | | |

## क) न्यायालयातर्फे साक्षीदार

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरूप | निशाणी |
|---|---|---|---|
| निरंक | | | |

## अभियोग पक्ष/आरोपी पक्ष/न्यायालयातर्फे शाबित झालेले निशानीबाबतचा तपशील

## अ) अभियोग पक्षातर्फे निशान (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १ | १ | दोषारोपपत्र |
| २ | नि.१ सोबत | अटकेचे नमुने |
| ३ | नि.१ सोबत | निवेदन |

## ब) आरोपी पक्षातर्फे निशान (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| निरंक. | | |

## क) न्यायालयातर्फे निशान

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| निरंक. | | |

**<u>ड) शाबित झालेला जप्त मुद्देमाल</u>**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| निरंक. | | |

========================================

**<u>न्यायनिर्णय</u>**

**<u>(घोषित दि. ०२/०७/२०२६)</u>**

========================================

१. आरोपीविरूध्द भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३५४अ,४५२ अन्वये गुन्हा केल्याचा आरोप ठेवून संपरिक्षित करण्यात आले आहे.

२. अभियोगपक्षाची हकीकत थोडक्यात अशी की, -

घटना ही दिनांक २०/०४/२०२२ रोजी सकाळी ५.३० वाजणेचे सुमारास थेरगाव, ता. शाहुवाडी गावचे हद्दीत फिर्यादीचे राहते घरात घडली आहे. फिर्यादी व आरोपी एकाच गावचे राहणारे असून नात्याने चुलत भावजय, चुलत दीर आहेत, तसेच ते एकमेकांचे शेजारी राहणारे असून दोन्ही घरास बंदीस्त गॅलरी आहे. घटनेचे वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीचे घराचे गॅलरीत येऊन दरवाजा उघडून घरात अनाधिकाराने प्रवेश करून घरातील जिन्यावरून खाली उतरून फिर्यादी घरात झोपलेल्या असताना फिर्यादीचा हात धरून फिर्यादीचे अंगास झोंबाझोंबी करून फिर्यादीचे मनास लज्ञा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग करण्याचे उद्देशाने तिचेशी शारीरीक जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. घटनेचे वेळी आरोपी फिर्यादीस म्हणाला की आरडाओरडा करायचा नाही, त्यावेळी फिर्यादीने तिचे सासूला हाका मारल्याने आरोपी तेथून पळून गेला. सदर घटनेनंतर दि.२९/०४/२०२२ रोजी फिर्यादीने सदर घटनेबाबत शाहूवाडी पो. ठाणे येथे आरोपीविरूध्द फिर्याद नोंदविली आहे.

३. फिर्यादी यांनी दाखल केलेल्या फिर्यादीवरून आरोपींविरूध्द शाहूवाडी पो. ठाणे येथे गु.र.नं.११०/२०२२ हा दाखल होवून त्याचा तपास श्री. एस. व्ही. पाटील, तत्कालीन पो.हे.कॉ.६५२, शाहुवाडी पो. ठाणे यांचेकडे वर्ग झाला होता. तपासअधिकारी

यांनी तपासादरम्यान घटनास्थळाचा पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले आणि तपासाअंती आरोपीविरूध्द पुरेसा पुरावा उपलब्ध झाल्यानंतर त्यांचेविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

४. मी यापूर्वी आरोपीविरूध्द निशानी ०९ येथे दोषारोप निश्चित केला आहे. आरोपीस निशानी ०९ वरील दोषारोप वाचून, समजावून सांगितला असता त्याने अपराधाची कबूली दिली नाही आणि संपरिक्षेची तयारी दर्शविली. आरोपीविरूध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा न आलेने त्याचा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आलेला नाही.

५. अभियोग पक्षाचा खटला, अभिलेखावरील पुरावा यावरून माझे विचारार्थ खालील मुद्दे आले आहेत व त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| <u>अ.क्र.</u> | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | आरोपीने दिनांक २०/०४/२०२२ रोजी सकाळी ५.३० वाजणेचे सुमारास थेरगाव, ता. शाहुवाडी गावचे हद्दीत फिर्यादीचे राहते घरात फिर्यादीचे घराचे गॅलरीत येऊन दरवाजा उघडून घरात अनाधिकाराने प्रवेश करून घरातील जिन्यावरून खाली उतरून फिर्यादी घरात झोपलेल्या असताना फिर्यादीचा हात धरून फिर्यादीचे अंगास झोंबाझोंबी करून फिर्यादीचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग करण्याचे उद्देशाने तिचेशी शारीरीक जवळीक साधण्याचा प्रयत्न केला आणि त्याद्वारे भारतीय दंड संहितेच्या कलम **३५४अ** प्रमाणे माझ्या आखत्यारित गुन्हा केला आहे हे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नकारार्थी. |
| २. | आरोपीने वरील नमूद दिनांकी, वेळी व ठिकाणी फिर्यादीचे घरात अनधिकृतपणे घुसून फौजदारीपात्र गृहअतिक्रमण केले आणि त्याद्वारे भारतीय दंड संहिताचे **कलम ४५२** खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे हे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| ३. | आदेश काय? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |

## कारणमिंमासा

## मुद्दा क्र. १ ते ३ करीता

६. अभियोगपक्षाने त्यांची बाजू सिध्द करण्यासाठी प्रकरणामध्ये एका साक्षीदाराची साक्ष नोंदविली आहे. साक्षीदार क्र १ निता रमेश घोलप या घटनेमध्ये फिर्यादी असून त्यांनी त्यांचे साक्षीत कथन केले की घटना दि.२०/०४/२०२१ रोजी पहाटे साडेपाचचे सुमारास त्यांचे राहत्या घरी घडली, त्या दिवशी त्या घरी झोपल्या असताना आरोपी त्यांचे घराच्या गॅलरीमधून त्यांचे घरामध्ये आला, याव्यतिरिक्त काही घडले नाही. सदर साक्षीदाराने फिर्यादीवरील तिची सही नि.१९ ओळखली, मात्र त्यातील मजकुर त्यांना माहीती नसल्याचे कथन केले. सदर साक्षीदाराने सरकारी वकिलांचे उलटतपासात दि.२०/०४/२०२२ रोजीचे तथाकथित घटनेबाबत व आरोपीचे सदर गुन्हादर्शक घटनेतील सहभागाबाबत विचारलेल्या सर्व प्रश्नांची नकारार्थी उत्तरे दिली. तसेच उलटतपासात फिर्यादी साक्षीदाराने फौ.प्र.सं. कलम १६४ चे जबाबावरील तिची सही नि.२० ओळखली, मात्र त्यातील मजकूर तला माहित नाही असे कथन केले. तसेच फिर्यादी साक्षीदाराने उलटतपासात कथन केले की तिचे व आरोपीमध्ये सदर प्रकरण कोर्टाबाहेर तडजोड होवून आपसात मिटलेले आहे.

७. अभियोग पक्षाने सदरकामी वरील साक्षीदाराव्यतिरिक्त अन्य कोणत्याही साक्षीदाराचा जबाब नोंदविलेला नाही. अभियोग पक्षाचा फिर्यादी साक्षीदार क्र. १ हीने अभियोग पक्षास साथ दिलेली नसून अभियोग पक्षास विसंगत साक्ष दिली आहे. फिर्यादीने आरोपीविरूध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपाबाबत व तथाकथित गुन्हादर्शक घटनेबाबत विचारलेल्या सर्व प्रश्नांची नकारार्थी उत्तरे दिली आहेत. फिर्यादीने तिचे साक्षीत कथन केले की आरोपीने घटनेचे वेळी तिचे राहते घराच्या गॅलरीमधून प्रवेश केला व याव्यतिरिक्त काही घडले नाही, तथापि यावरून आरोपीने घटनेचे वेळी फिर्यादीचे राहते घरात गुन्हा करणेचे उद्देशाने फौजदारीपात्र गृहअतिक्रमण केले आहे असे म्हणता येणार नाही. तसेच फिर्यादीने

तिचे उलटतपासात तिचे व आरोपीमध्ये सदरबाबत न्यायालयाबाहेर आपसात तडजोड होवून वाद मिटलेबाबत कथन केले असून तशा आशयाची संयुक्तिक पुरशिस नि.१७ वर दाखल करणेत आली आहे. तसेच फिर्यादी व आरोपी हे नात्याने एकमेकांचे चुलत भावजय, चुलत दीर आहेत. अभियोग पक्षास पुरेशी संधी देऊन देखिल त्यांनी सदरकामी अन्य कोणत्याही साक्षीदारास तपासलेले नाही. तसेच अभियोग पक्षाने सदरकामी तपासी अधिकारी, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार म्हणजे फिर्यादीची सासू अथवा अन्य कोणत्याही अनुशंगिक साक्षीदारास तपासलेले नाही. तसेच सदर घटनेचा अन्य कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अभियोग पक्षाचे पुराव्यावरून दिसून येत नाही. सबब, घटना नेमकी कशी घडली याचा खुलासा अभिलेखावरील पुराव्यावरून होत नाही. प्रस्तुत केसमध्ये आरोपीविरूध्द ठेवण्यात आलेले दोषारोप हे सबळ पुराव्यानिशी निर्विवादपणे शाबित होतील असा कोणताही पुरावा आरोपीविरूध्द अभिलेखावरील आलेला नाही. एकूणच, अभिलेखावरील पुराव्यावरून आरोपीविरूध्द ठेवण्यात दोषारोप हे सबळ पुराव्यानिशी निर्विवादपणे शाबित होत नाहीत, त्यामुळे आरोपी सदर गुन्ह्यातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे.

८. अभियोग पक्षाचे अभिलेखावरील पुराव्यामधून आरोपीविरूध्दचा दोषारोपामधील नमूद गुन्हा शाबित होत नाही. सबब, आरोपी प्रस्तुत गुन्ह्यातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब वर नमूद चर्चेस अनुसरून मी मुद्दा क्र.१ ते ४ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे आणि मुद्दा क्र. ५ करीता खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

**१.** आरोपी नामे संजय वसंत घोलप याची भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३५४अ,४५२ अन्वये शिक्षापात्र गुन्हयातुन भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१(१) नुसार निर्दोष मुक्तता करणेत येत आहे.

**२.** आरोपीचा जामीनकदबा रदद करणेत येवून त्यास सदरकामी स्वातंत्र्य देण्यात येते.

**३.** आरोपीने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१अ प्रमाणे जामीन दयावा.

( न्यायनिर्णय खुले न्यायालयात घोषित. )

Digitally signed by Pankaj Bhimrao Pawar

**स्थळ - शाहूवाडी**
**दिनांक – ०२/०७/२०२६**

**( पी. बी. पवार )**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**मलकापुर-शाहूवाडी, जि. कोल्हापुर**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | P.A. Vasudeo |
| Name of Court | P. B. Pawar, C.J.J.D & J.M.F.C. Malkapur-Shahuwadi |
| Date of Dictation | 02/07/2026 |
| Judgment signed by the P.O.on | 02/07/2026 |
| Judgment uploaded on | 02/07/2026 |